MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@mercindia.org.in / mercindia@merc.gov.in
संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. ५/२०१३–१४

## अंतर्गत लेखा परीक्षकांची निवड – विनंती प्रस्ताव

### आर्थिक वर्ष २०१०–११, २०११–१२ आणि २०१२–१३ करिता अंतर्गत लेखा परीक्षणासाठी सनदी लेखापाल संस्थेच्या नेमणुकीबाबत

महाराष्ट्र शासनाने विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ अंतर्गत स्थापना केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ), मुंबई, यांच्याकडून भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या पॅनलवर असलेल्या व खाली नमूद केलेल्या पात्रता निकषांमधील सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या सनदी लेखापालांच्या संस्थांकडून, विनंती प्रस्तावात नमूद केलेल्या विचारार्थ विषयांनुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यासह आर्थिक वर्ष २०१०–११, २०११–१२ आणि २०१२–१३ वार्षिक लेख्यांना अंतिम स्वरुप देण्यासाठी, विनंती प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

**पात्रता निकष** : अर्जदार संस्था ही (अ) भारताच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि भारतीय सनदी लेखापाल संस्था (आयसीएआय) यांच्या पॅनलवर आणि पाच वर्षांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीकरिता कार्यरत असावी; (ब) (भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या प्रमाणपत्रानुसार दि. १–१–२०१३ रोजी) संस्थेमध्ये चार वर्षांपेक्षा कमी नसलेल्या कालावधीकरिता सतत पूर्ण वेळ काम करणारे कमीत कमी चार सह–भागीदार असावे; (क) मागील तीन वर्षांत संस्थेची सरासरी उलाढाल दरवर्षी रु. २५ लाख असावी; (ड) कमीत कमी दहा (१०) वैधानिक लेखापरीक्षणे / अंतर्गत लेखापरीक्षणे संस्थेने केलेली असावीत आणि (इ) राज्य किंवा केंद्र सरकारच्या कमीत कमी चार स्वायत्त संस्था, कंपन्यांमध्ये लेखापरीक्षणाची कामे अर्जदार संस्थेवर सोपविलेली असावीत.

**सविस्तर विनंती प्रस्ताव** : अर्ज पाठविण्यासाठी पार्श्वभूमी, विचारार्थ विषय (टीओआर) आणि मार्गदर्शक सूत्रे इ. बाबींचा समावेश असणारा सविस्तर विनंती प्रस्ताव मविनिआ च्या **www.merc.gov.in** या संकेतस्थळावरुन उतरवून घेता येईल किंवा वरील पत्त्यावर असलेल्या मविनिआच्या कार्यालयातून कामाच्या दिवशी सकाळी ९.३० ते दुपारी १.०० आणि दुपारी २.०० ते संध्याकाळी ५.०० या वेळेत प्रत्यक्ष घेता येईल.

**महत्त्वाचे दिनांक :**

| | | | |
|---|---|---|---|
| I. | विनंती प्रस्ताव घेण्यासाठी अंतिम दिनांक | : | १५ मे, २०१३ |
| II. | बोली–पूर्व बैठकीचा दिनांक | : | १७ मे, २०१३ |
| III. | प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | २१ मे, २०१३ |
| IV. | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | : | २२ मे, २०१३ |

**मुंबई**
**दिनांक : ३ मे, २०१३**

**स्वाक्षरी/–**
**सचिव, मविनिआ**